# **As You Like It**: विल्यम शेक्सपियर

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

<u>प्रास्ताविकः</u>

१५९३ च्या सुमारास शेक्सपियर राणी एलिझाबेथ [पहिली] हिच्या राजाश्रयाने आपली नाटक कंपनी The Queen's Men सुरू करतो. ३/४ वर्षांच्या उमेदवारीनंतर त्याच्या जगप्रसिद्ध सुखांतिकांचा कालखंड [१५९६-२००१] सुरू होतो. या काळात स्त्री भूमिका करण्यास योग्य २ नाजूक सुंदर युवक त्याच्या कंपनीत होते; एक थोडासा उंच व अधिक सुंदर व दुसरा मध्यम कदाचा असे होते. त्याप्रमाणे त्यांना सोयिस्कर भूमिका व पुरूषवेषाची योजना शेक्सपियरने आपल्या सुखांतिकांमध्ये केली आहे. Twelfth Night मध्ये व्हायोला व ऑलिव्हिया अशा दोन स्त्री भूमिका आहेत व त्यातील व्हायोला ही बहुतांशी पुरूषवेषात आहे. Merchant of Venice मध्येही पोर्शिया व नेरिसा अशा दोन स्त्री भुमिका आहेत व दोघी बराच काळ पुरूषवेषात असतात. आता आपण जे नाटक अभ्यासणार आहोत त्या As You Like It मध्येही दोन स्त्री भूमिका व त्यातील नायिका बहुतांशी पुरूषवेषात आहे. उणिवांवरही [limitations] मात करून यशस्वी कथानके सादर करण्यातील लेखक व नाटककार शेक्सपियरचे हे कौशल्य अपूर्व आहे.

<u>प्रमुख पात्रेः</u>

| | |
|---|---|
| ड्यूक फ्रेड्रिकः | अन्यायाने झालेला अधिपती; धाकटा भाऊ |
| ज्येष्ठ ड्यूकः | कायदेशीर अधिपती; थोरला भाऊ |
| रोझॅलिंडः | ज्येष्ठ ड्यूकची कन्या; पुरूषवेषात 'गॅनीमेड' |
| सेलियाः | फ्रेड्रिकची कन्या; नंतर 'एलिना', गॅनीमेडची बहीण |
| ओरलॅंडोः | सर रोलॅड दी बॉइस यांचा धाकटा मुलगा |
| ऑलिव्हरः | सर रोलॅड दी बॉइस यांचा थोरला मुलगा; अन्यायी, स्वार्थी |
| अॅडमः | सर रोलॅड दी बॉइस यांचा इमानी नोकर |
| फीबी [Phebe]: | एक धनगर कन्या |
| सिल्वियसः | एक धनगर युवक; फीबीचा प्रियकर |
| टचस्टोनः | रोझॅलिंडबरोबर वनात आलेला सेवक, गंमत्या, विदुषक |
| ऑड्रेः | आर्डनच्या जंगलातील एक मुलगी; टचस्टोनची प्रेयसी |

<u>कथानकः</u>

शेक्सपियरच्या काळी फ्रान्स हे एकसंध राष्ट्र नव्हते. त्याचे ५/६ भूविभाग होते व प्रत्येकाचा अधिपती एक स्वतंत्र ड्यूक होता. अशाच एका संस्थानातील ही गोष्ट. त्या संस्थानाच्या कायदेशीर ड्यूकला, थोरल्या भावाला त्याचा धाकटा भाऊ फ्रेड्रिक सत्तेच्या लोभाने पदच्युत करतो व स्वतः ड्यूक होतो. थोरले ड्यूक सत्तेची अभिलाषा नसल्यामुळे आर्डनच्या जंगलात आपल्या काही सरदार मित्रांसह राहायला निघून जातात. निसर्गाच्या निरागस सान्निध्यात व पशुपक्षांच्या निष्पाप सहवासात ते आनंदाने कालक्रमणा करू लागतात व तिथेच रमतात. त्यांची एकुलती मुलगी रोझॅलिंड आपल्या

चुलत बहिणीवरील परस्पर प्रेमामुळे वडिलांच्या बरोबर न जाता राजवाड्यात मागे सेलियाबरोबर राहते. बहिणींचे एकमेकींवर खूप प्रेम असल्यामुळे रोझॅलिंड आपल्या वडिलांच्यापासून दूर असूनही आनंदात असते.

रोलँड दीबॉइस हे थोरल्या ड्यूकचे एक जुने सरदारमित्र असतात; त्यांना ३ मुलगे असतातः थोरला ऑलिव्हर अतिशय स्वार्थी व दुष्ट असतो. सर रोलँडच्या मृत्यूनंतर थोरला मुलगा या नात्याने तो सर्व मालमत्तेचा मालक होतो. दुसरा मुलगा जॅक्वेस थोरल्या ड्यूकबरोबर आर्देन वनात निघून जातो. धाकटा ओरलँडो मात्र थोरल्या भावाच्या स्वार्थी वागणुकीचा शिकार बनतो. वडिलांनी त्याच्या शिक्षणासाठी भरघोस आर्थिक तजवीज केलेली असते, पण ऑलिव्हर त्याला गुराख्यासारखी वागणूक देऊन अडाणी व निरक्षर ठेवतो; किंबहुना शक्य झाले तर त्याचा काटा काढून त्याचा सर्व हिस्सा हडप करण्याचा त्याचा इरादा असतो. ओरलँडो शिक्षणात जरी अडाणी राहिला तरी मोकळ्या हवेत गाई बैलांबरोबर राहून पिळदार शरीराचा बलदंड कुस्तीगीर झालेला असतो. पित्यासारखा तो सुस्वभावी सुसंस्कारी असतो.

ड्यूक फ्रेड्रिकने एकदा कुस्तीच्या स्पर्धा आयोजीत केल्या, त्यात ओरलँडोने दरबारचा मल्ल चार्ल्स याला आव्हान द्यायचे ठरवले. चार्ल्स हा दरबारी खुराकावर पोसलेला महाकाय मल्ल असतो. ऑलिव्हर त्याला "कुस्तीमध्ये ओरलँडोची मान मुरगाळून त्याला कायमचा खलास किंवा जबर जायबंदी कर" असे सांगतो; त्यासाठी त्याला लाचपण देतो.

स्पर्धा सुरू होते; ड्यूक फ्रेड्रिक दोघी मुलींना स्पर्धा पाहण्यासाठी बोलावून घेतो. चार्ल्सच्या समोर ओरलँडो खूपच किरकोळ दिसतो; एक दोन फेरीतच तो गतप्राण होईल असे ड्यूकला वाटते. तो ओरलँडोला जवळ बोलवून कुस्तीपासून परावृत्त करायचा प्रयत्न करतो. ड्यूकच्या सांगण्यावरून रोझॅलिंड व सेलिया पण त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न करतात. पण त्याची हिम्मत अविचल राहते. त्याचे उद्‌गार रोझॅलिंडच्या हृदयाला खोल स्पर्श करून जातात, "मला तुम्ही तुमचे आशीर्वाद, शुभेच्छा द्या, त्याने माझी उमेद वाढेल. जिंकलो तर आभार मानायला येईन, मेलो तर माझ्यासाठी दुःख करणारे कोणीही नाही." रोझॅलिंडला तो प्रथमदर्शनीच आवडला, त्याच्या शेवटच्या वाक्यामुळे तिच्या हृदयाची तार छेडली गेली आणि सहानुभूतीचे रूपांतर प्रेमात केंव्हा झाले तिला कळलेच नाही.

ओरलँडोने कमालीची चपळता दाखवून व झटपट हालचाली करून चार्ल्सवर मात केली. हात मोडलेला चार्ल्स विव्हळत खाली पडला आणि ओरलँडो फडविजेता ठरला. सर्वांनी त्याचा जयघोष केला. ड्यूकने बक्षीस देता देता त्याची ओळख विचारली आणि तो सर रोलँडचा धाकटा पुत्र आहे हे कळताच ड्यूकच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली; त्याचे फारसे कौतुक न करता ड्यूक निघून गेला. ओरलँडो दोन्ही राजकन्यांना अभिवादन करण्यासाठी आला; त्यांनी त्याचे मनापासून कौतुक केले. रोझॅलिंडने त्याला गळ्यातील मोत्यांची माळ भेट म्हणून दिली. तिच्या कौतुकाचा आवेग पाहून सेलिया उमगली की आपली बहीण या युवकाच्या प्रेमात पडली आहे.

थोड्या वेळाने ड्यूक तावातावाने त्याच्या महालात येतो आणि रोझॅलिंडला फर्मावतो की २४ तासांच्या आत तिने राजवाडा सोडून आपल्या वडिलांच्याकडे निघून जावे, अन्यथा तिची खैर नाही. रोझॅलिंड लोकांच्यात तिच्या सुस्वभावी वागण्यामुळे खूप प्रिय होती. त्यामुळे ड्यूक आधीच तिच्यावर नाराज होता. ओरलँडोशी तिच्या सहानुभूतीच्या वागण्यामुळे तो आणखी भडकला होता. त्याच्या अकारण रागामुळे सेलियाही ड्यूकवर नाराज होते व तीही रोझॅलिंडबरोबर वनात जायचे ठरवते. वनात जाण्याचा नेमका रस्ता माहिती नसल्याने प्रवासात त्रास होऊ नये म्हणून रोझॅलिंड पुरूषवेष घेते, गॅनीमेड हे नाव धारण करते व सेलिया एलिना नावाने तिची बहीण बनते. दोघी आर्डन वनाच्या दिशेने निघतात, त्याचवेळी कुस्तीच्या यशानंतर घरी जाणाऱ्या ओरलँडोला त्यांचा इमानी नोकर अँडम वाटेतच अडवतो व त्याला ऑलिव्हरच्या खऱ्या स्वरुपाची माहिती देतो: ऑलिव्हरने घरी त्याच्या खोलीला आग लावून झोपेतच त्याला यमसदनी पाठवायचा डाव रचलेला असतो. हे सर्व ऐकून ओरलँडो अँडमसह आर्डन वनाच्या दिशेने निघतो.

१५ दिवसांच्या खडतर वाटचालीनंतर वृद्ध अँडम थकतो व भुकेने आसन्नमरण होऊन खाली पडतो. ओरलँडो त्याच्यासाठी अन्न शोधत शोधत थेट थोरल्या ड्यूकच्या कँपवर येतो. तो सर रोलँडचा धाकटा मुलगा आहे हे कळताच ड्यूक अगत्याने त्याचे स्वागत करतात व अँडमसाठी भरपूर अन्न देतात व त्याच्या राहण्याची सोय करतात. दोघेही स्वस्थ झाल्यानंतर ओरलँडो वनात एकटा हिंडू लागतो व रोझॅलिंडच्या नावाने प्रेमकविता लिहून त्या वृक्षावर, दगडावर लटकावून भटकत रहातो.

धनगरी वेषात वनात फिरणाऱ्या गॅनीमेड व एलिना यांच्या पाहण्यात त्या कविता येतात व हे ओरलँडोचेच काम आहे हे त्यांच्या लक्षात येते. एके दिवशी त्यांची त्याच्याशी भेट होते व गॅनीमेड त्याला प्रेम कसे व्यक्त करावे हे शिकवण्याची ऑफर देतो. शिकवणी सुरू होते. ठरलेल्या दिवशी ते भेटतात व गॅनीमेडला रोझॅलिंड समजून प्रेम व्यक्त करण्याचा त्याला सराव मिळतो. काही दिवस असे जातात आणि एके दिवशी ओरलँडोच्या ऐवजी त्याचा थोरला भाऊ ऑलिव्हर त्यांना भेटायला येतो; तो ओरलँडोचा निरोप घेऊन आलेला असतो.

ओरलँडोच्या कुस्तीच्या विजयानंतर चिडलेला ड्यूक फ्रेड्रिक त्याला पकडण्यासाठी शोधमोहीम सुरु करतो. ऑलिव्हरला तो तंबी देतो की महिन्याच्या आत त्याने ओरलँडोला शोधून न आणल्यास त्याची सर्व मालमत्ता सरकारजमा केली जाईल. ऑलिव्हर त्यामुळे ओरलँडोच्या शोधात आर्डन वनात आलेला असतो. एकदा थकून झाडाखाली गाढ विश्रांती घेत असताना एक नाग व सिंहीण त्याच्यावर दबा धरून तो जागा होण्याची वाट पहात असतात. गॅनीमेडकडे निघालेल्या ओरलँडोला हे दृश्य दिसते व तो आपल्या जीव धोक्यात टाकून दोन्ही श्वापदांचा निकाल लावतो व आपल्या भावाचा जीव वाचवतो. पण त्या प्रयत्नात तो स्वतः जखमी होतो. त्याच्या या उदात्त कृत्याने हृदयपरिवर्तन झालेला ऑलिव्हर ओरलँडोने दिलेला त्याच्या रक्ताने माखलेला रुमाल घेऊन हा सगला वृत्तांत गॅनीमेडला सांगण्यासाठी तेथे ओरलँडोने सांगितल्याप्रमाणे आलेला असतो. ऑलिव्हरच्या तोंडून हा वृत्तांत ऐकताच गॅनीमेड धास्तावतो; आता शिकवणी संपवली पाहिजे हे त्याच्या लक्षात येते व पुढच्या भेटीत तो ओरलँडोला "तो रोझॅलिंडशी लग्न करायला तयार आहे

का" असे स्पष्ट विचारतो व त्याचा होकार येताच  दुसऱ्याच दिवशी  लग्नाच्या सर्व तयारीने थोरल्या ड्यूकच्या कॅम्पवर येण्यास सांगतो. त्या वेळी रोझॅलिंडला हजर ठेवण्याची तो हमी देतो.

या दरम्यान एक त्रांगडे निर्माण झालेले असते. धनगरी वेषातील देखण्या गॅनीमेडवर ’फीबी’ ही धनगर कन्या प्रेम करू लागते. त्या फीबीवर प्रेम करणारा सिल्व्हियस नावाचा एक धनगर युवक असतो. गॅनीमेडचे स्वतःचे ओरलँडोवर प्रेम असते. हा प्रेमाचा चौकोन गॅनीमेड मोठ्या हुशारीने आपल्या लग्नाच्या वेळीच सोडवतो.

दुसऱ्या दिवशी ड्यूकच्या कँपवर सगळा उलगडा होतो. गॅनीमेड रोझॅलिंडच्या - राजकन्येच्या - वेषात पुढे येते. आपली लाडकी कन्या भेटल्यामुळे खूष झालेले ड्यूक ती आपल्या प्रिय मित्राच्या पुत्राशी विवाहित होते आहे हे जाणून हर्षविभोर होतात व आनंदाने दोघांना प्रेमाशीर्वाद देतात. दरम्यान ऑलिव्हर व एलिना [सेलिया] यांचेही एकमेकावर प्रेम बसलेले असते; त्यांचेही ओरलँडो-रोझॅलिंड समवेत लग्न होते. गॅनीमेड ही स्वतः मुलगी आहे हे जाहीर झाल्याने फीबी-सिल्व्हियस यांचा तिसरा विवाह होतो आणि त्याचवेळी टचस्टोन नावाचा रोझॅलिंडचा गमत्या विदुषक ऑड्रे नावाच्या धनगर कन्येशी विवाह करतो; हा चौथा विवाह. एकाच मंडपात थोरल्या ड्यूकच्या आशीर्वादाने हे चार विवाह संपन्न होतात आणि सुखांतिकेचा शेवट लग्नाने होतो हे चौपट सिद्ध करतात.

या आनंदात भर घालणारी आणखी एक बातमी येतेः धाकटा ड्यूक फ्रेड्रिक मोठे सैन्य घेऊन थोरल्या ड्यूकवर हल्ला करण्याच्या तयारीने निघालेला असतो. पण आर्डन वनाच्या सीमेवर त्याला एक साधू भेटतो. त्याच्या उपदेशाने फ्रेड्रिकच्या मनात परिवर्तन होते. तो थोरल्या ड्यूकला त्याचे राज्य व इतर वनवासी सरदारांना त्यांच्या जहागिरी परत देऊन टाकतो व स्वतः वनवासाला निघून जातो. प्रजाजन आपल्या राजाची सहर्ष वाट पहात असतात.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com